०९५८ - २१


ISSN : 2278-9308
April, 2021

Impact Factor – 7.675 ISSN – 2278-9308

# B.Aadhar

## Peer-Reviewed & Refreed Indexed

### Multidisciplinary International Research Journal

## April -2021

ISSUE No- 285 (CCLXXXV)

### Sciences, Social Sciences, Commerce, Education, Language & Law

**Prof. Virag.S.Gawande**
**Chief Editor :**
**Director**
**Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.**

**Dr.Dinesh W.Nichit**
**Editor :**
**Principal**
Sant Gadge Maharaj Art's Comm,Sci Collage, Walgaon.Dist. Amravati.

## Aadhar International Publication

For Details Visit To : www.aadharsocial.com
© All rights reserved with the authors & publisher

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) -7.675, Issue NO, 285 (CCLXXXV)
ISSN : 2278-9308
April, 2021

# INDEX


| No. | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | Dr. B.R Ambedkar Towards The Empowerment Of Indian Women **Dr.Datta Uttamrao Kuntewad** | 1 |
| 2 | Dr. Ambedkar's Educational Philosophy for the Emancipation of Downtrodden Society in India **Dr. Tukaram Bobade** | 6 |
| 3 | A study Ambedkar's Perspective Of Hindu Social System And His Notion Of Social Justice **Mr. Chandrakant B. Dhumale** | 11 |
| 4 | Dr. B. R. Ambedkar's Contribution to Federalism Enshrined in the Constitution of India **Prof. Rahul G. Mahure** | 17 |
| 5 | Single Parenting : A Psychological Perspective **Dr. Neha Hirurkar** | 22 |
| 6 | A Study of Speed between Athletes and Non-Athletes of Nagpur District of Maharashtra State **Pankaj Patil/ Dr. V. S. Pawar** | 25 |
| 7 | A Comparative Study of selected Health Related Physical Fitness between National and State level Atyapatya Players **Ankush A. Ghate /Dr. V. S. Pawar** | 27 |
| 8 | Catastrophic Events and Incidents in the Poetry of K. N. Daruwalla **Dr. Satish G. Joshi** | 31 |
| 9 | Sports Injury And First-Aid Techniques **Dr.Subhash M. Shekokar** | 35 |
| 10 | Study of Human Psychology and Lifestyle for Healthcare during Corona Virus **Dr. S. M. Bhowate** | 40 |
| 11 | दलित साहित्याचे प्रेरणास्थान : डॉ. बाबासाहेब आंबेडकर **डॉ. विष्णू नामदेव लांडे** | 45 |
| 12 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक योगदान **डॉ.व्ही.बी. चांदजकर** | 48 |
| 13 | सामाजिक जडणघडणीत डॉ.बाबासाहेबांचे योगदान **डॉ.पंढरी डोईफोडे** | 50 |
| 14 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि धर्मांतराची चळवळ **प्रा.सुदर्शन उद्धवराव स्वामी** | 53 |
| 15 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक कार्य **डॉ.आर.व्ही. मोरे** | 57 |
| 16 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे परराष्ट्र धोरणविषयक विचार **प्रा. डॉ. विलास आबा गायकवाड** | 61 |
| 17 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार **डॉ. गजानन कुबडे** | 65 |
| 18 | डॉ. आंबेडकर आणि भारतीय संविधानातील यशापयश **डॉ. अनंता सूर** | 69 |
| 19 | समावेशी विकास में कृषि क्षेत्र **डॉ. संजय जे. कोठारी** | 76 |
| 20 | महाराष्ट्रातील खरीप पिकांचा भौगोलिक अभ्यास **डॉ. अंकुश नारायणराव बारमाटे** | 82 |
| 21 | समाजातील अंधश्रद्धा, त्याची कारणे, प्रक्रिया व अंधश्रद्धेचा पगडा कमी करण्याचे उपाय : एक मानसशास्त्रीय अध्ययन **प्रा.अरुणा तसरे** | 87 |

**B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal**
Impact Factor - (SJIF) -7.675, Issue NO, 285 (CCLXXXV)
ISSN : 2278-9308
April, 2021

# सामाजिक जडणघडणीत डॉ.बाबासाहेबांचे योगदान

**डॉ.पंढरी डोईफोडे**
प्राध्यापक ,मराठी विभाग प्रमुख संत भगवान बाबा कला महा.विद्यालय सिंदखेडराजा जि.बुलडाणा

**प्रस्तावना :-**

डॉ.बाबासाहेब हे हिंन्दु समाजातील दलित वर्गाचे कैवारी त्यांनी आपले सारे जीवन अस्पृश्याच्या उध्दारासाठी खर्च केले. त्यांच्याा रूपाने महाराष्ट्रातील राजकीय व सामाजिक जीवनात वेगळे सामर्थ्य उभे राहीले. त्या सामर्थ्याचा अविष्कार विवेचन बुध्दीमतेतुन धवल चरित्र्यातून आणि धगधगत्या ध्येयवादातून झाला. त्यांच्यात आशावाद निर्माण झाला. स्वतःच्या अस्मितेची जाणिव त्यांना झाली आणि स्वतःच्या जीवनातील स्वत्व संघर्षाशिवाय आपल्याला प्राप्त होऊ शकणार नाही. या गोष्टीचे भान त्यांना अगदी प्रकर्षाने झाले. स्वतंत्र भारताच्या राज्य घटनेचे शिल्पकार म्हणून त्यांनी केलेले कार्य या देशाच्या इतिहासात सुवर्णाक्षराने लिहून ठेवले गेले.

भारतीय समाजजीवनात जाती व्यवस्था हा घटक अत्यंत प्रभाव शाली होता. हिंदु समाजाच्या जातीमुळे विभाजन झाले होते. तसेच हिंन्दु धर्मात काही जातींना श्रेष्ठ आणि पवित्र तर काही जातींना कनिष्ठ आणि अपवीत्र मानन्यात येई अशा स्थितीत उच्च जातीचे ब्राम्हण व ब्राम्हनेत्तर लोक अस्पृश उमेदवारांना मदत करतील हे शक्य नव्हते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा हा लढा अशा अस्तित्वाहिनांच्या अस्तित्वाखाली होता. हा मानवमुक्तीचा लढा होता. या क्रांतीचा केंद्रबिंदु हा शोधीत पिडीत माणूस होता. कारण अस्पृश्य समजल्या गेलेला या समाजाला हजारो वर्षे अनान्वेत करण्यात आला. त्याला या समाज व्यवस्थेने लाचारी, दारिद्रये, अज्ञान, अपमान याशिवाय काहीही दिलेले नव्हते. इतका अमानुष्य छळ, इतक्या प्रदिर्घ काळ जगातील कोणत्याही समाजाला सहन करावा लागला नाही. जातीव्यवस्थेचे चटके बाबासाहेबांना लहान पणीच सोसावी लागली. त्यामुळे त्यांची तीव्रता त्यांना ठाऊक होती ही अतिशय विषम सामाजिक व्यवस्था समतेच्या पातळीवर आणण्याचे बाबासाहेबांनी ठरविले हजारो वर्षे गुलामीच्या चिखलात रूजलेल्या या समाजाला बाहेर काढण्याची आणि त्यांना त्यांचे मानुसकीचे हक्क मिळऊन देण्याची प्रतिज्ञा बाबासाहेबांनी केली.

**डॉ.बाबासाहेबांचे सामाजिक कार्य**

महात्मा फुले प्रमाणेच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी इथल्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक,विषमतेचे उन्मत तोडण्याचा जणू प्रण केला आहे. पूर्ण कालखंडात महात्मा फुले व अन्य काही कार्यकर्ते वगळता अन्य लोकांच्या दलित चळवळीकडे व दलित समाजाची खरी खुरी गरज काय? या पेक्षा मी काय करू शकतो ते महत्वाचे या परिस्थितीत पालट घालण्याचे काम त्यांनी केले. दलितांच्या प्रचंड सहभागाशिवाय कोणतेही कार्य किंवा चळवळ यशस्वी होणार नाही. याची खुनगाठ मनाशी बांधूनच त्यांनी दलितामध्ये आत्मविश्वास निर्माण केला. स्वाभिमान मानुसकीच्या हक्का बद्दल प्रेम व तळमळ आणि ध्येयासाठी परिश्रम करण्याची राजकीय क्षेत्रात नेण्याचे धोरण स्विकारले दलितांमध्ये ही संघर्ष लढण्याची विद्रोही भावना निर्माण करून त्यांची अस्मिता जागविण्याची महत्व कार्य पहिल्यांदा कोणी केले असेल तर ते म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांना त्यांच्या मुलभुत मानवी अधिकारांची त्यांना जाणीव करून दिली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजसुधाकर व उधारक नव्हते तर ते त्याहुन कोणी मोठे प्रवर्तक होते कारण अस्पृश्यता निवारण आणि दलितोध्दाराचे कार्य करणे, अस्पृशांना मतदानाचा हक्क, कामगारांवरील अन्याया विरूध्द प्रखर लढा, बहिष्कृत हितकारणी सभेची स्थापना, महाड येथील चवदार तळ्यातील सत्याग्रह, मनस्मृतीचे दहन, अंबादेवी मंदिर प्रवेश सत्याग्रह, पुणे पार्वती मंदिर सत्याग्रह, काळाराम मंदिर सत्याग्रह, पुणे करार यासारखे अनेक सामाजिक उपभोगी असणारे जीवनातील संघर्षमय कार्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केले आहेत. यातूनच त्यांची समाजजीवनाबद्दलची तळमळ दिसून येते.

**शेती सबंधी विचार कार्यप्रणाली**

आंबेडकरांच्या संपत्र व्यक्तिमहत्वाच्या एक महत्वपुर्ण पैलुकडे मात्र हवे तितके लक्ष दिले गेले नाही. ते एक निष्णात अर्थशास्त्रज्ञ होते. त्यांचे सर्व अर्थशास्त्रीय लेखन स्वातंत्र्यपुर्व कालखंडातील आर्थिक समस्यांशी निगडीत असून ही त्यांचा दुरदर्शीपणा व त्यांच्या विचारातील सखोलपणा यामुळे त्यांचे लेखन देशाच्या काही आर्थिक समस्यांवर अगदी समर्थपणे प्रकाश पाडू शकते. लहान धारणक्षेत्रे ही भारतीय शेतीला भेडसावणारी एक गंभीर समस्या आहेच परंन्तू ही पहिली गोष्ट म्हणजे वारसा हक्क हे जमीनीच्या विभाजनाचे प्रमुख कारण आहे. या मताशी आंबेडकर सहमत होते त्यांच्या मते जमीनीवर पडत असलेल्या लोकसंख्येचा प्रचंड भार हेच त्यांचे मुख्य काराण होय. आंबेडकरांच्या मते भारतातील शेती मधून अतिरिक्त उत्पादन न झाल्यामुळे भांडवलाचा

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) -7.675, Issue NO, 285 (CCLXXXV)
ISSN : 2278-930
April, 2021

तुटवडा निर्माण होते ही शेतीची खरी समस्या आहे. शेती क्षेत्रातील फार मोठी लोकसंख्या व प्रत्यक्ष लागवडीखालील जमिनीचे अत्यल्प प्रमाण यामुळे स्वाभाविकपणे शेती क्षेत्रातील काही लोकसंख्या वाजवीपेक्षा अधिक व बेकार राहते. उद्योगीकरण हेच आंबेडकरांनी या प्रश्नाचे दिलेले निःसंदिग्ध उत्तर. उद्योगीकरणाचे संचयी लाभ होतात. पहिला फायदा असा की, त्यामुळे शेती क्षेत्रातील अनावश्यक व बेकार श्रम उत्पादक अशा बिगर शेतीक्षेत्रात सामावून घेता येतील. दुसरी गोष्ट अशी की, जमिनीपासून मिळणारा फायदा संपुष्टात येईन जमीनी वरील भार कमी होईल परिणामतः जमीनीचे विभाजन व विखंडन करण्याच्या प्रवृत्तीस आळा बसेल. अशा तऱ्हेने आंबेडकरांच्या मते भारतातील शेतीचे प्रश्न सोडविण्याचा उद्योगीकरण हा एकच खात्रीलायक उपाय होय. तसेच आंबेडकरांच्या मते मुलभुत उद्योग आणि विमा या प्रमाणे सर्व जमीन शासनाने स्वतःच्या ताब्यात घ्यावी अशी त्यांची शिफारस होती. मग अशी जमीन खाजगी व्यक्तींच्या मालकीची असो कुळे म्हणून असो की त्यांच्याकडे ती जमीन गहान असो मात्र ज्यांच्याकडून जमीन घेतली त्यांना योग्य ती नुकसान भरपाई दिली जावी या बद्दल त्यांचा आग्रह होता.

**भारतातील स्त्रियांचे उध्दार कर्ते**

सामाजिक समतेच्या आंदोलनात स्त्री, पुरूष समानता यावर महात्मा फुले यांनी जेवढा भर दिला तेवढाच भर बाबासाहेबांनी स्त्री मुक्तीच्या संदर्भात हिंदु कोड बिलाच्या रूपाने दिलेला होता. कर्मकांड, आंधश्रध्दा दुर सारण्याच्या कामी स्त्रीच पुढाकार घेऊ शकते यावर त्यांची प्रगाढ श्रध्दा होती. स्त्रीयांना पुरूषांप्रमाणेच प्रत्येक समान स्थान व समान दर्जा हक्क मिळावा यासाठी कायद्याची तरतुद करून स्त्री दासमवियोजन केले. डॉ.आंबेडकरांनी हिंदु कोड बिलाच्या माध्यमातुन स्त्री हक्काची जणु सनदच सादर केली.

पिढ्यान पिढ्या कधी पित्यावर, कधी पतीवर तर कधी पुत्रावर स्त्रियांना अवलंबुन राहावे लागत असे. स्वावलंबन हे स्त्रीस माहितीतच नव्हते कारण स्त्रीस हा अधिकार जुन्या परंपरानुसार नव्हताच पुरूषसन्माक समाजव्यवस्थेच्या या भारतात स्त्रियांचे सर्वच बाबतीत शोषन होते. त्यांना दुय्यम दर्जा होता. ही सर्व महिलांची शोषण प्रक्रिया थांबवायची होती म्हणून बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदु कोड बिल निर्माण केले. या विधेयकात महिलांच्या वारसाहक्काची महत्वपुर्ण तरतुद आहे. स्त्रियांच्या प्रगतीच्या आड त्यांची विवाह येतात. म्हणून मुलींनी लग्ने लवकर करून वैवाहिक जीवन त्यांच्यावर लादु नका असे बाबासाहेब आंबेडकर आवर्जुन सांगत. परंतु तत्कालीन परिस्थितीत त्याला त्या काळातील महिलांनी समर्थन दिले नाहीं. त्यामुळे १९५१ मध्ये त्यांनी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा देखील दिला. पण नंतर ते बील पास झाले व स्त्रीला एक स्वतंत्र व्यक्तिमत्व त्यामुळे मिळाले याचे संपूर्ण श्रेय डॉ.आंबेडकरांच जाते.

**धर्म परिवर्तन आणि मानवमुक्ती संदर्भातील योगदान**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी इ.स.१९३६ येरवाडा येथे घोषणा केली होती की, मी हिंदु म्हणून जन्माला आलो पण हिंदु म्हणून मरणार नाही आणि १४ ऑक्टोंबर १९५६ ला बौध्द धम्माची दिक्षा दिली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी बौध्द धम्म स्विकारून व बौध्द धर्माची दिक्षा घेऊन धर्म परिवर्तन तर केलेच पण त्याच बरोबर हजारो वर्षा पासून सामाजिक धर्मीक नैत्रिक गुलामगिरीत असलेल्या मानवाला मुक्त केले. माणूस म्हणून सन्मानाने जीवन जगण्याचा मार्ग बहाल केला. अस्पृश्य बांधवांना एक नवा चेहरा बहाल करून अस्मिता प्राप्त करून दिली. काळ बदलला, माणसं बदलली मात्र विचारात आजही फारसा फरक पडलेला दिसून येत नाही. हे तर या देशातल्या शुद्रातिशुद्रांच्या संदर्भात झाले पण स्त्री कोणत्याही धर्माची व संप्रदायाची असो तिच्यावर अन्यायच होत आहे. माणूस धर्माकरीता नाही धर्म माणसा करीता आहे माणुसकी प्राप्त करून द्यायची असेल तर धर्मांतर करा समता प्राप्त करून घ्यायची असेल तर धर्मांतर करा. स्वातंत्र्य प्राप्त करून घ्यायचे असेल तर धर्मांतर करा. डॉ.बाबासाहेबांनी जगातील सर्व धर्मांचा अभ्यास केला आणि नंतर बौध्द धर्माचा स्वाकार केला. त्यांनी धर्म परिवर्तन करून या देशातल्या मानवांना मुक्त केले.

**निष्कर्ष :-**

१) परंपरागत मूल्यांच्या व संस्काराच्या दडपणाखाली स्त्री जगते आहे हे नाकारून चालत नाही, यासाठी आंबेडकरी विचारांची व कार्याची पुन्हा उजळणी करणे गरजेचे आहे.

२) स्त्री मुक्ती म्हणजे मानवमुक्ती, स्त्रियांचा विकास झाल्याशिवाय मानवी समाजाचा विकास होवू शकत नाही.तेंव्हा स्त्रियांना पुरूषांप्रमाणंच अधिकार मिळाले, म्हणून स्त्रीया मध्ये आज विकास झालेला दिसून येतो.

३) त्या काळातील प्रचलीत अनिष्ठ रूढींना विरोध करून स्त्रीयांच्या प्रगती करीता हिंदु कोड बिलाच्या माध्यमातुन महिलांना एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून जगण्याचा अधिकार मिळावा.

४) सामाजिक चळवळीच्या माध्यमातुन बाबासाहेबांनी पिडीत, दलित, पद दलीत, अस्पृश्य समाजाला जागृत करण्याचा प्रयत्न केला तसेच त्यांना सवर्णाच्या अन्यायाच्या विरूध्द लढण्याचा मार्ग दाखविला.

५) जात व तत्सम कोणत्याही गोष्टीच्या आधारे गावकऱ्यांमध्ये भेदभाव न करता सर्वांना सामुदायीक शेतीमध्ये सामावून घेऊन कुणीही जमीनदार असणार नाही किंवा शेतमजुर असणार नाही असे विचार डॉ.बाबासाहेबांनी मांडल्याचे दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ**

१) भारतीय संविधान व डॉ.बाबासाहेब आंबेडकर - नरेंद्र चपळगावकर, विद्या प्रकाशन,पुणे
२) महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास - जी.एल.भिडे, एन.डी.पाटील
३) डॉ.आंबेडकर आणि सामाजिक सांस्कृतिक अभिसरणाचे क्रांतीसंदर्भ - डॉ.योगेंद्र मेश्राम
४) महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास - गणेश राऊत
५) डॉ.बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ - संपा.वैद-सोनसळे